जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१६/०४/२०२४
## दि.१५/०४/२०२४ रोजी रात्री ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

| | |
|---|---|
| **१** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे ९४/२०२४,भादविक २७९,३०४(अ),मो.वा.कायदा कलम,१८४,११९/१७७, |
| **फिर्यादी** | रुपाली अंबादास तोरडमल म.पोलिस अमंलदार नेमणुक शिवाजीनगर पो.स्टे.पुणे शहर |
| **आरोपीत** | बॉबी निरंजन चांदेकर वय ४८ वर्षे रा.शिलानंद सोसायटी,फ्लॅट नं.१३,सोमनाथ नगर वडगांवशेरी पुणे (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०७/०२/२०२४ रोजी १७/४० वाजण्याचे सुमारास कामगार पुतळा जवळील ब्रिजवरती, |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी ब्रिजचे सिमेंट कठडयाला व लोखंडी ग्रिलला स्वतः धडकुन त्यामध्ये गंभीर जखमी होऊन,स्वतःचे मृत्युस कारणीभुत झालेला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी.पाटील मो.नं.९९७५२०३२४० |
| **२** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे १३३/२०२४,भादविक ४१९,४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४१ वर्ष रा.गुलटेकडी पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल,व्हॉटसअप,बँक खाते धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना वरील मोबाईल धारक यांनी फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन फिर्यादी यांचे विरोधात मनी लॉड्रींगची केस आहे.असे सांगुन चौकशी करण्याच्या बहाण्याने संगणमत करुन लबाडीच्या इरादयाने फिर्यादी यांना पैसे पाठवण्यास सांगुन फिर्यादी यांची एकुण ३,६५,००० /- रुपये इतक्या रकमेची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | व.पो.निरी. फुलपगारे मो.नं.७७२२०५४७०१ |
| **३** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे १४४/२०२४,भादविक ४१९,४२०,३४ माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४३ वर्षे, रा.सिंहगड रोड,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल व गुगलपे धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे फेसबुक पाहत असताना अनोळखी इसमाने होंडा ॲक्टीव्हा दुचाकी गाडी ही २१,०००/- रुपयांमध्ये मिळेल अशी टाकलेली पोस्ट पाहुन त्यावरील मोबाईल नंबर वर फोन केला असता बुकींगसाठी २१५०/- रुपये भरल्यानंतर दि.०५/११/२०२३ रोजी मो.नं. वरुन फोन करुन लोहगाव पुणे मिलेट्री ट्रान्सपोर्ट येथे गाडीचा गेटपास करीता ट्रान्झेक्शन मॅच होत नसल्याचे सांगुन गुगलपे मो.नं.वर ५०००/- रुपये घेवुन आयडीएफसी बॅक एसी नंबर व मो.नं. हा एसएमएस करुन वारंवार मो.नं.वरुन फोन करुन ट्रान्झेक्शन मॅच होत नसल्याचे कारण |

| | |
|---|---|
| | सांगुन गुगलपे यावर पैसे ट्रान्सफर करण्यास भाग पाडुन फिर्यादीकडुन एकुण १,४४,६३२/- रुपये घेवुन मो.नं.वरुन वारंवार फोन करुन पैशाची मागणी करुन फिर्यादी यांना दुचाकी गाडी न देता,त्यांचे पैसे परत न देता आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | व.पो.निरी.नंदकुमार गायकवाड,मो.नं.९८७०४७५३३५ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे.८७/२०२४,भादविक ३५३,१८६,३२३,५०४ महा दारूबंदी कायदा ८५ महा पो अधि ११२,११७ |
| **फिर्यादी** | भाऊसाहेब सुखदेव बनकर,पोलिस अमंलदार,फरासखाना वाहतूक विभाग,पुणे शहर |
| **आरोपीत** | दत्ता मनिष गोमासे,वय २४ वर्ष रा.श्री.लॉज,तुळशीबाग,मंडई,पुणे |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १५/०४/२४ रोजी साय १६/४५ ते १७/३० वा.चे दरम्यान बुधवार चौक,छत्रपती शिवाजी रोड,पुणे येथे सार्वजनिक वाहतुकीचे रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे वाहतूक नियमनाचे सरकारी कर्तव्य करीत असताना यातील नमुद इसम हा दारू पिऊन येऊन फिर्यादी यांना शिवीगाळ करून अंगावार धावून जावून जीवे मारण्याची धमकी देवून शासकीय कर्तव्य बजाविण्यात अडथळा निर्माण करून कर्तव्य पार पाडण्यापासून रोखले व सार्वजनिक ठिकाणी मोठमोठयाने आराडाओरडा करून सार्वजनिक शांततेचा भंग केला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. दाढे मो.नं.९६०४००२९८२ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे.१७५/२०२४,भादविक ४१९,४२०,५०७,३४ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ड,६७ अ. |
| **फिर्यादी** | एक इसम वय १९ वर्षे, रा.विमाननगर,पुणे. |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | वरील मोबाईल धारक यांनी फिर्यादी यांचे मॉर्फ केलेले ७ ते ८ अश्लिल फोटो फिर्यादी यांचे टेलिग्राम अकाऊंटवर पाठवून ते फोटो फिर्यादी यांचे आई-वडीलांना पाठविण्याची धमकी दिली.तसेच फिर्यादी यांचे व्हॉट्सअप नंबर वर क्यु.आर.कोड पाठवून तो कोड स्कॅन करायला सांगून फिर्यादी यांना मी त्यांची एस्कॉर्ट सर्व्हिस घेतली असल्याचे सांगितले व ती सर्व्हिस रद्द करायची असेल तर पैसे द्यावे लागतील असे धमकावुन फिर्यादी यांना ७८,५००/- रूपये ऑनलाईन माध्यमाव्दारे पाठविण्यास भाग पाडुन फिर्यादी यांची आर्थीक फसवणूक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) सर्जेराव कुंभार मो.नं.९९२३०७५४३४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**